# जळगाव जिल्हा परिषदेमधील गट-क च्या सरळसेवेची आणि सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगाव यांचे आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठीची जाहिरात

जाहिरात क्रमांक - **1/2015** दिनांक :- 31/10/2015

**ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक एपीटी-२०१४/ प्र.क्र.१३९/आस्था-८ दि.१५/१०/२०१५ तसेच वित्त विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील शासन निर्णय संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१ मुंबई दि.०२/०६/२०१५ अन्वये** जिल्हा परिषदेतील गट क व गट ड च्या सरळसेवेच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया **करणेबाबत निर्देश देण्यात आलेले असुन शासनाच्या विहीत** वेळापत्रकानुसार सन 2015 च्या **माहे नोव्हेंबर** महिन्यात राबविण्यात यावीत असे निर्देश **असल्याने** जिल्हा परिषदेमधील गट क मधील विविध संवर्गातील रिक्त पदे खालील प्रमाणे भरावयाची आहेत.

या संकेतस्थळावरुन <u>मे-2015</u> च्या जाहीरातीस अनुसरुन केलेली भरती प्रक्रिया शासन आदेशान्वये रद्द करण्यात आलेली असल्याने त्याकरीता ऑनलाईन अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी <u>**पुन्हा नव्याने अर्ज करणे**</u> आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

**तसेच, सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगाव यांचे अधिपत्याखालील कनिष्ठ लिपीक संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. सदर रिक्त पदे देखील खालीलप्रमाणे भरावयाची आहेत.**

**त्यानुसार** अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच जिल्हा परिषदेच्या **www.zpjalgaonexam.com** या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 03/11/2015 रोजी दुपारी **12.00** वाजेपासून | दिनांक 17/11/2015 सांयकाळी **6.00** वाजेपर्यंत |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात **www.zpjalgaonexam.com** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने केलेलेच अर्ज व विहित चलनाद्वारेच परिक्षा शुल्क स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

**सदर जाहिरात शासनाच्या आरक्षण धोरणानुसार बिंदु नामावली तपासणी तसेच शासनाच्या वेळोवेळी येणाऱ्या अद्ययावत निर्देशांच्या अधीन राहून देण्यात येत आहे. शासनाच्या निर्देशनानुसार** भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत निर्णय अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी जळगांव हे स्वत:कडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

सरळसेवा भरतीने भरण्यासाठी सामाजिक व समांतर आरक्षणानुसार रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

**१) बांधकाम विभाग - स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंशकालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनुसूचीत जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | अनुसूचीत जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | वि.जा(अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ४ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **एकुण** | **४** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **४** | **४** |

**२) बांधकाम विभाग - कनिष्ठ अभियंता**

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | भज (क) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | अपंग अस्थिव्यंग (खुला) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | **एकुण** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **३** |

**३) आरोग्य विभाग - आरोग्य सेविका (स्त्री)**

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनु. जाती | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |
| २ | अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | भ.ज.(ड) | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |
| ४ | इ.मा.व. | ६ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ४ | ६ |
| ५ | खुला | ३२ | ५ | ० | ३ | २ | १ | २ | १ | १८ | ३२ |
| | **एकुण** | ४७ | ८ | ० | ४ | २ | १ | २ | १ | २९ | ४७ |

**टिप :- उपरोक्त रिक्त पदांमधुन अपंगाची ८ पदे भरावयाची असल्याने शासन निर्णय दि.१४ जानेवारी २०११ नुसार एका पायाने अपंग (OL) पात्र उमेदवार अर्ज करु शकतील. (खुला प्रवर्गातील अपंग-१ दर्शविण्यात आलेले पद हेदेखील सदर ०८ पदांमध्येच समाविष्ट आहे)**

४) महिला व बालविकास विभाग – पर्यवेक्षिका (अंगणवाडी)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **एकुण** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **३** | **३** |

५) ग्रामपंचायत विभाग (कंत्राटी ग्रामसेवक)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनु. जाती | ९ | १+२ | ३ | १ | ० | ० | ० | ० | २ | ९ |
| २ | अनु.जमाती | ६ | १+१ | २ | १ | ० | ० | ० | ० | १ | ६ |
| ३ | भज (ड) | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ४ | इमाव | ६ | १+१ | २ | १ | ० | ० | ० | ० | १ | ६ |
| ४ | खुला | १३ | २+१ | ४ | १ | १ | ० | १ | ० | ३ | १३ |
| | **एकूण** | **३६** | ५+५ =१० | **१२** | **४** | **१** | **०** | **१** | **०** | **८** | **३६** |

टिप :- माजी सैनिक रकान्यातील अनुसूचीत जाती प्रवर्गातील ०२, अनु.जमातीतील ०१, इमाव प्रवर्गातील ०१, खुला प्रवर्गातील ०१ पद ही मागील भरती वर्षातील माजी सैनिकांसाठी राखीव असलेली पदे आहेत.

६) पशुसंवर्धन विभाग (पशुधन पर्यवेक्षक)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | ए कु ण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनुसूचीत जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | खुला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | २ | १ | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | २ |

टिप :- माजी सैनिक रकान्यातील खुल्या प्रवर्गातील ०१ हे मागील भरती वर्षातील माजी सैनिकांसाठी राखीव असलेली पदे आहेत.

७) कृषी विभाग (विस्तार अधिकारी (कृषी) वर्ग-३ श्रेणी-२)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनुसूचीत जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

८) कनिष्ठ लिपीक (सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगाव यांचे कार्यालयातील पद)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | अनुसूचीत जाती | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| २ | अनुसूचीत जमाती | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ३ | इमाव | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ४ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकुण** | | ७ | **०** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **४** | ७ |

९) कनिष्ठ अभियंता – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकुण** | | १ | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | १ |

१०) कृषी अधिकारी – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | अंश कालीन कर्मचारी (पदवीधर) | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | |
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकुण** | | १ | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | १ |

**रिक्त पदांचा तपशिल, शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दि.17/11/2015 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे

**<u>पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता</u> :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | उमेदवार शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणा-या किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण असावा त्यामध्ये उमेदवार ॲपियर असता कामा नये किंवा पुढीलपैकी समकक्ष पाठयक्रम<br>(१) आर्किटेक्चरल ड्राफटमन (वास्तुशास्त्रीय आरेखक),<br>(२) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक),<br>(३) आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठयक्रम,<br>(४) National Council of Training For Vocational Trades (NCTVT)/ National Apprentice Certificate (NAC) व्दारा सैनिकी सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवायझर पदावरील या शाखेतील अनुभवाच्या आधारे देण्यात येणारे प्रमाणपत्र (शासनाकडुन प्राप्त स्पष्टीकरणानुसार स्थापत्य अभियांत्रिकी संबंधातील उच्च अर्हता प्राप्त पदविका/ पदवीधारक देखील सदर पदासाठी अर्ज करु शकतील.) |
| २ | कनिष्ठ अभियंता | १. कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदासाठी स्थापत्य अभियांत्रिकी या विषयावरील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करुन असतील अशा उमेदवारांमधुन<br>२. संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| ३ | आरोग्य सेविका (स्त्री) | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या महा.नर्सिंग कौन्स्लिचा १८ महिन्यांचा कोर्स उत्तीर्ण केलेला असावा. व रजिस्ट्रेशन आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>२) प्रशिक्षित बंधपत्रित (ए.एन.एम.) उमेदवारांना सुध्दा अर्ज करता येतील. |
| ४ | पर्यवेक्षिका (अंगणवाडी) | १) ज्यांनी एखाद्या संविधानिक विद्यापीठाची स्नातक पदवी धारण करीत असतील अशा महिला उमेदवार, समाजकार्य, समाजशास्त्र,गृहविज्ञान, पोषण आहार किंवा त्यास समतुल्य म्हणुन शासनाने घोषीत केलेली कोणतीही पदवी अर्हता धारण केलेली असावी. मान्यता प्राप्त विद्यापीठाची समाजकार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातक पदवी धारण करीत असलेल्या उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल.<br>२) सदर उमेदवारांना संगणकाची शासनाने निर्धारीत केलेली एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | उमेदवाराची नियुक्ती ही पुढील पैकी कोणत्याही एका प्रकारे करण्यात येईल.<br>१) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेले जे उमेदवार ३३ वर्षापेक्षा अधिक वयाचे नसतील आणि<br>२) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (३ वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासन मान्य संस्थेची समाजकल्याण पदवी (बी.एस.डब्ल्यू) किंवा<br>३) कृषि पदविका अभ्यासक्रम किंवा कृषी पदवी किंवा बी.टेक (ॲग्री इंजिनियरींग) ही कृषी विषयाची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. आणि<br>४) संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल. |
| ६ | पशुधन पर्यवेक्षक | • (अ) संविधिक विद्यापीठ पशुवैद्यक शास्त्रातील पदवी/पदविका धारण करीत असलेल्या व्यक्ती किंवा<br>(ब) पशुधन पर्यवेक्षक, पशुपाल, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी (ब-श्रेणी) याबाबतची पशु सवंर्धन संचालनालयाने दिलेली पुढील पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती. |

| | | |
|---|---|---|
| | | • त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशुवैद्यक पालन प्रशिक्षण अभ्यासक्रम.<br>• पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्यातील संविधिक कृषी विद्यापीठे यांनी चालविलेला पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम.<br>• पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशु वैद्यक व पशु संवर्धन शास्त्र या मधील दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविकासह अभ्यासक्रम आणि खालील संस्थांनी चालविलेला पशु वैद्यक शास्त्र विषयासह दुग्ध शाळा क्षेत्र व्यवस्थापन व पशु संवर्धन पदविका या मधील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम.<br>• (एक) महाराष्ट्र तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ किंवा (दोन) राज्यातील विविध संविधिक कृषी विद्यापीठे किंवा ज्यामुळे नोंदणीकृत पशु वैद्यकीय सेवा करण्याचा हक्क असेल अशी भारतातील कोणतीही पशुवैद्यकिय संस्थांची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती परंतु किरकोळ पशु वैद्यकिय सेवा करण्याचा हक्क मिळवून देणाऱ्या पदविकेचा किंवा प्रमाणपत्र धारकाचा, भारतीय पशु वैद्यक परिषद अधिनियम १९८४ (१९८४ चा ५२८) च्या कलम ३० चा खंड (ख) च्या परंतुकातील स्पष्टीकरणान्वे व कलम ५७ अन्वये कृषी/पशुसंवर्धन दुग्ध व्यवसायात विकास व मत्स व्यवसाय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात काढलेल्या क्रमांक आयव्हीसी-१००६/प्र.क्र.५३२/पदुम-४ दि.२७ ऑगस्ट २००९ च्य अधिसुचनाव्दारे विनीर्दिष्ट केलेल्या किरकोळ पशु वैद्यकिय सेवा देण्यास हक्कदार असेल. |
| ७ | विस्तार अधिकारी (कृषी) वर्ग-३ श्रेणी-२ | संविधिक **विदयापिठाची कृषि विषयातील पदवी**, **बी टेक (ऍग्री.इंजिनियरिंग)पदवी** किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केली असेल **त्याचबरोबर ज्यांनी कृषि कामाची उच्च शैक्षणिक अर्हता व कृषि कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारित कृषिचा ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल.** |
| ८ | कनिष्ठ लिपीक सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगाव यांचे कार्यालय. | 1) किमान अर्हता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2) टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा कमीत कमी मराठी – ३० शब्दप्रती मिनीट किंवा इंग्रजी -४० शब्दप्रती मिनीट परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक सदर वेगाबाबतची शासनामार्फत घेण्यात येणारी परिक्षा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास किंवा त्तपूर्वी उत्तीर्ण असणे व त्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br>3) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.<br>4) **महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39, दि. 04/02/2013 मध्ये नमुद केलेनुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.** नसल्यास शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि.१९/०३/२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहिल.<br>5) माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.<br>6) शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/ प्र.क्र.०८/२०१०/१६अ दि.०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरच्या निवडणूक कर्मचारी व पदविधर /पदविकाधारीक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपीक/टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ०६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल. सदर मुदतीच्या आंत संबंधित उमेदवारास |

| | | |
|---|---|---|
| | | विहित केलेली टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. |
| ९ | **कनिष्ठ अभियंता – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | १. कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदासाठी स्थापत्य अभियांत्रिकी या विषयावरील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करून असतील अशा उमेदवारांमधुन<br>२. संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| १० | **कृषी अधिकारी – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | या पदासाठी ज्यांनी कृषी विषयातील स्नातकोत्तर पदवी किमान दुसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण केली असेल किंवा संविधीक विद्यापीठातून कृषी विषयक पदवी, बी.टेक (ॲग्री इंजिनियरींग) पहिल्या वर्गात प्राप्त केली असेल किंवा कोणतीही इतर समतुल्य अर्हता धारण केली असेल. |

**आवश्यक व महत्वाची सुचना :- वरील अ.क्र. १ ते ७ व ९,१० वर नमुद पदे ही जिल्हा परिषद,जळगाव या कार्यालयाची असुन अ.क्र. ८ वर नमुद पद हे सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगाव यांचे कार्यालयातील आहे. त्यामुळे अर्ज सादर करताना उमेदवारांनी त्याची नोंद घ्यावी.**

## <u>वयोमर्यादा</u>

उपरोक्त पदांकरीता जाहिरातीच्या दिनांक- 17 /11/2015 रोजी वयोमर्यादा गणली जाईल. (2) उपरोक्त पदांकरीता जाहिरातीच्या दिनांकास उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 33 वर्षापेक्षा जास्त नसावे.(3) मागासवर्गीय उमेदवारांचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे, परंतु उन्नत व प्रगत गटांमध्ये क्रिमिलेयर (Creamy Layer) मोडणा-या वि.जा-अ, भ.ज-ब, भ.ज-क, भ.ज-ड, विशेष मागास प्रवर्ग आणि इ.मा.व. ना ही सवलत लागु नाही.

**कमाल वयोमर्यादा पुढील प्रकरणी शिथिलक्षम असेल.**

1. शारीरिक दृष्टया अपंग उमेदवारंच्या बाबतीत वयाचे 45 वर्षापर्यंत.
2. माजी सैनिकांच्या बाबतीत त्यांच्या "सध्याच्या वयामधून त्यांच्या सशस्त्र दलातील सेवकावधी + ३ वर्ष वय कमी करुन जे वय येईल ते वय ग्राहय धरण्यात येईल. तथापी अशा प्रकारे Calculation करुन येणारे वय हे सदर पदांच्या सेवाप्रवेशासाठी जी सर्वांकरीता लागू केलेली वयाची अट आहे त्यापेक्षा जास्त नसावे. तथापी अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत.
3. (अ) सन 1991 चे जनगणना कर्मचारी व (ब) सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी या उमेदवारांना कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत.
4. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थ सहाय्य या योजने अंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकिय गट क पदावरील सरळसेवेने त्यांना सध्याच्या 45 वर्ष वयोमर्यादेत आणखी एक वर्षाने वाढ करुन सदर सवलत 46 वर्षापयंर्त देण्यात येईल.
5. खेळाडुंच्या गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम.
6. प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल.
7. आरोग्य सेविका स्त्री या पदासाठी जाहिरातीच्या दिनांकास वय १८ वर्षापेक्षा कमी व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.

8. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचे बाबतीत जे उमेदवार सन १९८० – १९८१ ते १९८६ – १९८७ च्या दरम्यान तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकिय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा ४७ वर्ष इतकी शिथील करता येईल.

## विशेष सुचना

1) गट क च्या पदांकरीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दिनांक 19/3/2003 अन्वये अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे खालील नमुने प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीनंतर दोन वर्षाच्या आत हजर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

2) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परिक्षा अथवा GECT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. (क) मराठी,हिंदी भाषेसह शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

3) सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पुर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना / शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

4) कंत्राटी ग्रामसेवकांसाठी शासन निर्णय दि.२० एप्रिल २००६ अन्वये ग्रामसेवकांची कंत्राटी पध्दतीवर असलेली नियुक्ती ०३ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल. ज्या उमेदवारांची कामगिरी चांगली असेल तर त्यांची सेवा नियमित करण्यात येईल. कामकाज समाधानकारक नसल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

5) कंत्राटी पध्दतीने नेमणुक मिळणाऱ्या ग्रामसेवकांकडे आर्थिक व्यवहाराची जबाबदारी राहणार असल्यामुळे नेमणुक देण्यापूर्वी त्या उमेदवारांकडून रक्कम रु.१०,०००/- सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात येईल. व विहित नियमानुसार दोन लायक व्यक्तींची रु.५०००/- प्रमाणे जामीन पत्र देणे आवश्यक राहिल.

6) **कनिष्ठ अभियंता/कृषी अधिकारी विशेष तांत्रिक अधिकारी (मनरेगा कक्ष) या पदासाठी विशेष सुचना-**

शासन निर्णय आस्थाप २०१५/प्र.क्र.८८/मग्रारो-३ मंत्रालय मुंबई दि.२४ जुलै २०१५ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनांतर्गत विशेष तांत्रिक अधिकारी - मगांराग्रारोहयो (Special Technical Officer-MGNREGA) म्हणून भरण्यात असल्याने सदरील पद हे अस्थायी स्वरुपाचे असुन ते तदर्थ तत्वावर (Adhoc Basis) प्रथमतः निर्माण करण्यात आलेली असून सदर पदांची मुदत ही दि.३१/०७/२०१७ पर्यंत राहिल. निवड झालेल्या उमेदवारांना जिल्हयातंर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना कार्यान्वीत असलेल्या तालुक्याच्या ठिकाणी नेमणूक देण्यात येईल. तथापी त्यांची कर्तव्य ही शासन निर्णय दि.२४ जुलै २०१५ चे प्रपत्र क मध्ये दर्शविण्यात आल्यानुसार राहतील. तसेच निवड व नेमणूक याबाबतचे अंतिम अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वय जिल्हा परिषद,जळगांव यांचे राहतील.

**पदनिहाय वेतनश्रेणी :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतन संरचना (वेतनश्रेणी) |
|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | वेतन बँड रूपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रूपये २४०० |
| २ | कनिष्ठ अभियंता | वेतन बँड रूपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रूपये ४३०० |
| ३ | आरोग्य सेविका (स्त्री) | वेतन बँड रूपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रूपये २४०० |
| ४ | पर्यवेक्षिका (अंगणवाडी) | वेतन बँड रूपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रूपये ४१०० |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | कंत्राटी पध्दतीने ग्रामसेवक म्हणून नियुक्त होणाऱ्या उमेदवाराला एकत्रित मानधन दरमहा र.रु.६०००/- व नियमित ग्रामसेवकांप्रमाणे प्रवास भत्ता देय राहिल. |
| ६ | पशुधन पर्यवेक्षक | वेतन बँड रूपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रूपये २४०० |
| ७ | विस्तार अधिकारी (कृषी) वर्ग-३ श्रेणी-२ | वेतन बँड रूपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रूपये ४२०० |
| ८ | कनिष्ठ लिपीक सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगांव यांचे कार्यालय | वेतन बँड रूपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रूपये १९०० |
| ९ | **कनिष्ठ अभियंता – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | वेतन बँड रूपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रूपये ४३०० |
| १० | **कृषी अधिकारी – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | वेतन बँड रूपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रूपये ४४०० |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.**

लेखी परिक्षा प्रश्नपत्रिका :-

शासन परिपत्रक क्र.एपिटी-2014/प्र.क्र.139/आस्था-8 दि.05 जुलै, 2014 सोबतचे परिशिष्ठ ब नुसार लेखी परिक्षा प्रश्नपत्रिकेचे स्वरुप खालील प्रमाणे विषयानुरुप राहील.

| अ.क्र. | संवर्ग | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधित प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बुध्दिमापन व गणित संबंधित प्रश्न | | तांत्रिक प्रश्न संबंधित प्रश्न | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| २ | कनिष्ठ अभियंता | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ३ | आरोग्य सेविका (स्त्री) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ४ | पर्यवेक्षिका (अंगणवाडी) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | -- | -- | १०० | २०० |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ६ | पशुधन पर्यवेक्षक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ७ | विस्तार अधिकारी (कृषी) वर्ग-३ श्रेणी-२ | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ८ | कनिष्ठ लिपीक सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगांव यांचे कार्यालय | **पात्र उमेदवारांना शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ दि.१९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १०वी) आहे अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असले व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.** | | | | | | | | | | | |
| ९ | **कनिष्ठ अभियंता – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| १० | **कृषी अधिकारी – विशेष** | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष) | | | | | | | | | | | | |

<u>लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा पदनिहाय दर्जा खालीलप्रमाणे राहील.</u>

| अ. क्र. | संवर्ग | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | एस.एस.सी. दर्जाची परीक्षा व तांत्रिक प्रश्न. |
| २ | कनिष्ठ अभियंता | सर्व विषय एस.एस.सी. दर्जा व अभियांत्रिकी पदवीका दर्जाची परीक्षा. |
| ३ | आरोग्य सेविका (स्त्री) | एस.एस.सी. दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न. |
| ४ | पर्यवेक्षिका (अंगणवाडी) | मराठी १२ वी चा दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा. |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परीक्षा व कृषी पदवीका दर्जाचे प्रश्न. |
| ६ | पशुधन पर्यवेक्षक | मराठी १२ वी चा दर्जा, विज्ञान व आरोग्य संबंधित प्रश्न पदविका दर्जाची परीक्षा. |
| ७ | विस्तार अधिकारी (कृषी) वर्ग-३ श्रेणी-२ | मराठी १२ वी दर्जा, कृषी संबंधीत प्रश्न, पदवी दर्जाची परीक्षा. |
| ८ | कनिष्ठ लिपीक सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगांव यांचे कार्यालय | परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्य दर्जाच्या समान असेल. |
| ९ | **कनिष्ठ अभियंता – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | सर्व विषय एस.एस.सी. दर्जा व अभियांत्रिकी पदवीका दर्जाची परीक्षा. |
| १० | **कृषी अधिकारी – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | मराठी १२ वी दर्जा, कृषी संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा |

1. ग्राम विकास विभागाकडील दि.०५ जुलै २०१४ रोजीच्या शासन परिपत्रक निर्देशनानुसार लेखी परिक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. तसेच प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक ०२ गुण ठेवण्यात येतील.
2. पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणानूक्रमे निवड यादीमध्ये समावेश शासनाच्य वेळोवेळी मार्गदर्शक सुचनेनुसार करण्यात येईल.

<u>रिक्त पदे भरतीचा संभाव्य कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.</u>

| अ.क्र. | पदाचे नाव | शासनाने विहित केलेला लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | दिनांक २ डिसें. २०१५ रोजीस दुपारी २ ते ३.३० |
| २ | **कनिष्ठ अभियंता** | दिनांक २८ नोव्हें. २०१५ रोजीस सकाळी १० ते ११.३० |
| ३ | **आरोग्य सेविका (स्त्री)** | दिनांक २५ नाव्हें. २०१५ रोजीस दुपारी २ ते ३.३० |
| ४ | **पर्यवेक्षिका (अंगणवाडी)** | दिनांक २५ नोव्हें. २०१५ रोजीस दुपारी २ ते ३.३० |
| ५ | **कंत्राटी ग्रामसेवक** | दिनांक २ डिसें. २०१५ रोजीस सकाळी १० ते ११.३० |
| ६ | **पशुधन पर्यवेक्षक** | दिनांक २८ नोव्हें. २०१५ रोजीस सकाळी १० ते ११.३० |
| ७ | **विस्तार अधिकारी (कृषी) वर्ग-३ श्रेणी-२** | दिनांक २५ नाव्हें. २०१५ रोजीस दुपारी २ ते ३.३० |
| ८ | **कनिष्ठ लिपीक सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगांव यांचे कार्यालय** | दिनांक २८ नोव्हें. २०१५ रोजीस दुपारी २ ते ३.३० |
| ९ | **कनिष्ठ अभियंता – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | दिनांक २८ नोव्हें. २०१५ रोजीस सकाळी १० ते ११.३० |

| | | |
|---|---|---|
| १० | **कृषी अधिकारी – विशेष तांत्रिक अधिकारी (म.न.रे.गा.कक्ष)** | दिनांक २५ नाव्हें. २०१५ रोजीस दुपारी १० ते ११.३० |

- लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

<u>**पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**</u>

1. लेखीपरीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादि जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अश्याच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती **व ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत,** मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अश्या उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आणी/किंवा समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.
2. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील पात्र उमेदवाराद्वारे भरले जाईल.
3. **सामान्य प्रशासन विभागाकडील दि.५ ऑक्टोंबर २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार समान गुण असलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल.**
4. _**कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना जि.प.जळगांव अंतर्गत बांधकाम, सिंचन, ग्रा.पा.पु. या विभागांतर्गत आवश्यकतेनुसार पद स्थापना दिली जाईल. उमेदवारास विशिष्ठ विभागास पदस्थापनेसाठी मागणी करता येणार नाही.**
5. **सह जिल्हा निबंधक वर्ग-१ जळगांव यांचे कार्यालयातील कनिष्ठ लिपीक या पदावर अंतिम निवड होणाऱ्या उमेदवारांना सह जिल्हा निबंधक वर्ग-१ यांचे अधिनस्त कार्यालयातच पदस्थापना देण्यात येईल.**

<u>**नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी**</u>

१) www.zpjalgaonexam.com या अधिकृत संकेत स्थळावरूनच ऑनलाईन अर्ज भरावा.
२) शासन निर्णय सा.प्र.विभाग,क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९/०३/२००३ अन्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे खालील नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.
३) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकि कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.
४) विभागीय व भाषा परीक्षा :- विहित शासकीय नियमांनुसार विभागीय परीक्षा भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
५) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
६) सेवाप्रवेश नियमांनुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
७) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारिरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादिची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/नियुक्ती रद्द होईल. तसेच या पदांसंबंधी शासनाकडून आवश्यक सहमती प्राप्त झाल्यानंतरच उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

९) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (मागासवर्गीयांसाठी आरक्षण अधिनियम २००४ मधील कलम ४ (३) नुसार विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण परिवर्तनिय असेल)

१०) महिलांचे आरक्षणाबाबतच्या तरतुदी शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र.८२/२००१/म.से.आ/२०००/प्र.क्र.४१५/का-दि.२५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहिल. दि.३१ मार्च २०१५ **नंतरचे** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दि.२५/१०/२००५ मधील परिच्छेद क्र.४ व ७ मध्ये नमुद केलेनुसार संपकालीन कर्मचारी १९८१ व १९९१ चे जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन पदविधर बेरोजगार यापैकी उमेदवार गुणवत्ता यादीमध्ये जर एका पेक्षा जास्त उमेदवार एकाच क्रमांकावर असतील तर शासन निर्देशाप्रमाणे प्राधान्यानुसार वर नमुद संवर्गातील उमेदवारांना प्राधान्य देऊन उमेदवारांची निवड करण्यात येईल.

१२) कंत्राटी आरोग्य सेविका म्हणून काम केलेले उमेदवार अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणात मोडत नाही. अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकारी (तहसिलदार) यांचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहिल.

## ➢ ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत

१. प्रस्तुत पदांकरीता फक्त www.zpjalgaonexam.com या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना जिल्हा निवड समिती, जळगांव जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

२. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.zpjalgaonexam.com या वेबसाईटद्वारे दिनांक ०३/११/२०१५ ते दि.१७/११/२०१५ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

३. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांचे पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती, जळगांव यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराने कागदपत्रांमध्ये खोटी माहिती/प्रमाणपत्र दिल्याचे आढळल्यास त्याचे विरुध्द भा.द.वि. नुसार फौजदारी गुन्हा इ. कारवाई करण्यात येईल.

५. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.zpjalgaonexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन ३ प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समिती जळगाव प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराला चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या ३ प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व जिल्हा निवड समिती, जळगांव प्रत स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडून परत मिळेल. त्यापैकि जिल्हा निवड समिती जळगांव प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समिती, जळगांव यांचेकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी केली जाणार नाही. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा **अंतिम** दिनांक १८/११/२०१५ हा राहिल. या दिनांकानंतर बँकेत परीक्षा शुल्क **भरणा-या उमेदवारांचा विचार पुढील प्रक्रियेकरीता केला** जाणार नाही.

६. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.zpjalgaonexam.com या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

७. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा सुरु असलेला ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीद्वारे होणार असल्याने अचुक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वतःचा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करून www.zpjalgaonexam.com संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहित पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

८. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

९. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरून विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रूपरेषा/ वेळापत्रक/ परिक्षाकेंद्र/ बैठक इत्यादि बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१०. अपंग संवर्गातील उमेदवाराकडे अपंगत्वाचे किमान प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असावे. अपंग उमेदवारास लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परीक्षेची शुल्क रक्कम रू.१०० ही चलनाद्वारे परिक्षा शुल्का मध्ये वाढ करून त्याप्रमाणे भरावी लागेल व ती नापरतावा राहील. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल. लेखनीक केवळ अल्पदृष्टी/अंध तसेच हाताचे अपंगत्व असलेल्या अपंग उमेदवारास पुरविणेत येईल इतर अपंग उमेदवारांना लेखनीक पुरविला जाणार नाही.

११. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररीत्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत तसेच अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१२. शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.३०/४/२००५ मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधरक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण हे समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे. खेळाडूंच्या

आरक्षित पदावर नेमणुकीकरिता ज्या उमदेवारांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील तपासणी अहवालानंतरच त्यांची नेमणुक देण्यात येईल.

१३. अंशकालीन उमेदवारांनी, त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्ष दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

१५. भूकंपग्रस्त/ प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दि.३१/०३/२०१५ नंतरचे / अद्ययावत (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र.८२/२००१/म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि.२५/५/२००१ मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल. यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणाअंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष **२०१५-१६** या कालावधी करिता वैध असलेले (अद्ययावत अर्थात ३१/०३/२०१६ पर्यंत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे.

१८. विहित वयोमर्यादेतील शासकीय/ निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

१९. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट-अ,ब,क,ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

२०. अनुभवाच्या बाबतीत मासिक नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन, तत्वावर केलेला अंशकालीक सेवाचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

२१. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/ कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२२. शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२ डिसेंबर २०११ नुसार ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे अशा उमेदवारांना आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील.

२३. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभुल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२४. वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि.१ नोव्हेंबर २००५
रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही.

२५. अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

२६. परीक्षेस /कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

## ➢ परीक्षा शुल्क

खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

खुला प्रवर्ग - रू.३००/- मागास प्रवर्ग - रू.१५०/-

माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे.

(वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

टिप :- स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रू. 40/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक ०३/११/२०१५ (दुपारी १२.०० वाजेपासून) ते दिनांक १७/११/२०१५ (सायं.६.०० वाजेपर्यंत) |
| २ | बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १८/११/२०१५ |

**विशेष सूचना :-**

- ➢ या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.
- ➢ अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी 8793083712 /8793083713 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**दिनांक :- ३१/१०/२०१५.**

**सदस्य, जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी,जळगांव.**